प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. १ व २ यांनी मूळ दाव्याच्याकामी कैफियत व तुर्तातूर्त ताकीद अर्जावर म्हणणे वेळेत न दिलेने त्यांच्याविरुध्द झालेला विना कैफियतीचा आदेश व तुर्तातूर्त ताकीद अर्ज विना म्हणणे चालविण्याचा आदेश रद्द होऊन त्यांची कैफियत व तुर्तातूर्त ताकीद अर्जावर म्हणणे याकामी सामील करुन घेणेबाबत दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांचे असे म्हणणे आहे की, त्यांचे शिक्षण कमी असल्याने त्यांना न्यायीक प्रक्रियेची माहिती नाही, तसेच त्यांनी वकिलांशी संपर्क साधलेला नव्हता. त्यांना दाव्याच्या पुढील तारखा समजलेल्या नव्हत्या. प्रतिवादी क्र. १ यांची तब्येत बिघडलेली असल्याने त्यांना वकिलांना भेटून माहिती देणे शक्य झाले नाही. त्यांची देखभाल प्रतिवादी क्र. २ करत असल्याने त्यांनाही वकिलांजवळ जाता आले नाही. त्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत व म्हणणे देता आले नाही त्यामुळे त्यांनी जाणूनबुजून विलंब केलेला नाही. त्यांनी मुदतीत कैफियत व म्हणणे न दिल्यामुळे न्यायालयाने त्यांच्या विरुध्द विनाकैफियतीचा आदेश व तुर्तातूर्त ताकीद अर्ज विनाम्हणणे चालविण्याचा आदेश पारीत केला आहे. सबब, प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याविरुध्द कैफियत नाहीचा झालेला आदेश व तुर्तातूर्त ताकीद अर्जावर म्हणणे नाहीचा झालेला आदेश नैसर्गिक न्यायतत्त्वाच्या आधारे रद्द करुन त्यांची कैफियत स्वीकारणेस विनंती केली आहे.

३. प्रस्तुतकामी वादी यांनी प्रस्तुत अर्जावर निशाणी ३९ येथे म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे कथन आहे की प्रतिवादी प्रिटींगचा व्यवसाय करतात व प्रतिवादी क्र. २ चा नवरा, मुले व जावई हे अतिशय हुशार असून कायद्याने ज्ञान नसणे हे अत्यंत चुकीचे म्हणणे आहे कारण कायद्याचे तथाकथीत अज्ञान हे माफ करता येणार नाही. त्यांनी आपले वकील नेमलेले आहे. दाव्याच्या चौकशीचे काम पुढे ढकलणेचा बेतात प्रस्तुत प्रतिवादी आहेत जेणे करुन त्यांना जास्तीत जास्त विनाशुल्क दावा इमल्याचा वापर करता येईल आणि त्याद्वारे वादीस नुकसान पोहोचविण्याचा कुटील डाव प्रतिवादींनी मांडला आहे. त्यामुळे वादीचे नुकसान होत आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र. १ व २ यांचा अर्ज त्यास वादींतर्फे विधीज्ञांनी दिलेले म्हणणे तसेच दोन्ही बाजूंचा युक्तीवाद यांचा विचार करून खालील मुद्दे माझे विचारार्थ आले असून त्यावरील

निष्कर्ष खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र. १ व २ यांचा सदरचा अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे का ? | होय. |
| २. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ बाबतः-</u>**

५. अर्ज व म्हणणे वाचले. प्रस्तुत अर्जात नमूद कारणे अभिलेख पाहता संयुक्तिक वाटत नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी दाव्याचे कामी आपली कैफियत व तुर्तातूर्त ताकीद अर्जावर म्हणणे दिलेले दिसून येत नाही. परंतु, याकामी जर प्रतिवादी क्र. १ व २ यांना आपली बाजू मांडण्याची संधी न दिलेस त्यांच्या हक्कास ते मुकणार आहेत. ही बाब खरी आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी सदर कामी कैफियत व तुर्तातूर्त ताकीद अर्जावर म्हणणे दाखल करणेस विलंब केलेला आहे. परंतु तो विलंब वादी यांना खर्च देवून भरून निघू शकतो. तसेच सदरचा विलंब केवळ तांत्रिक कारणामुळे झालेला आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्त्वाचा विचार केला असता सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य ठरेल. सबब, मी या निष्कर्षापर्यंत येत आहे की, सदरचा प्रतिवादी क्र. १ व २ यांचा अर्ज मंजूर होणेस पात्र असल्याने मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देऊन मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष देणेकरीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याविरुध्द झालेला दि.१७/१०/२०२३ रोजीचा दावा विनाकैफियत व निशाणी ५ वरील तुर्तातूर्त ताकीद अर्ज विनाम्हणणे चालविण्याचा आदेश त्यांनी वादीस रक्कम रुपये १००/- (रूपये शंभर मात्र) चा खर्च देण्याच्या अटीवर रददबातल करण्यात येतो.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

DATTAPRASAD YASHVANT RAIRIKAR

Digitally signed by DATTAPRASAD YASHVANT RAIRIKAR
Date: 2024.12.14 10:24:25 +0530

दिनांकः- ०७/१२/२०२४.

(डी.वाय.रायरीकर)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), वेंगुर्ला.